IJCRT.ORG ISSN : 2320-2882

INTERNATIONAL JOURNAL OF CREATIVE RESEARCH THOUGHTS (IJCRT)
An International Open Access, Peer-reviewed, Refereed Journal

# "वेरूळ लेणी : एक आंतरराष्ट्रीय पर्यटन स्थळ"

**डॉ. भालेराव ए. एस.**
सहयोगी प्राध्यापक, संशोधन मार्गदर्शक व भूगोल विभागप्रमुख,
चिस्तीया कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, खुलताबाद,
जि. छ. संभाजीनगर

**नाव:दळवी हेमंत भुजंगराव**
संशोधक विद्यार्थी,
भूगोल विषय,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छ. संभाजीनगर.

**सारांश:**

औरंगाबाद हा महाराष्ट्र राज्यातील पर्यटनाच्या दृष्टीने एक महत्त्वाचा जिल्हा आहे. औरंगाबाद (छ. संभाजीनगर) शहरापासून अवघ्या ३० कि.मी. अंतरावर जागतिक वारसा लाभलेले वेरूळ पर्यटन स्थळ असून हे केंद्र सुमारे ६ व्या आणि १० व्या शतकातील आहे. याठिकाणी बौध्द, हिंदू व जैन धर्माच्या लेण्या आहेत. हे ठिकाण पर्यटकांचे आकर्षण असल्यने येथे जगभरातून प्रतिदिन हजारो पर्यटक भेटी देतात. त्यामुळे या स्थळांचा सामाजिक-आर्थिक प्रभाव दिसून येतो. वेरूळ हे एक जागतिक पर्यटन स्थळ असून ते परकीय चलन प्राप्त करते आणि भेट रोजगाराद्वारे स्थानिक अर्थकारणाला चालना देते म्हणुन प्रस्तुत शोधनिबंध 'वेरूळ लेणी' या आंतरराष्ट्रीय पर्यटन स्थळावर प्रकाश टाकतो.

- **बीजसज्ञा:** पर्यटन स्थळ, लेणी, आकर्षण, पर्यटक प्रभाव

- **प्रस्तावना**

पर्यटनाच्या घटनेने जवळपास संपूर्ण जगाला आकर्षित केले आहे.[१] "एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी प्रवास करणे व ठराविक काळानंतर मुळ ठिकाणी परत येणे म्हणजे पर्यटन होय." यामध्ये पर्यटक नैसर्गिक, ऐतिहासिक, धार्मिक, सांस्कृतिक, कला, स्थापत्य आदी घटकांची माहिती प्राप्त करण्यासाठी भ्रमंती करतो.[२] असे इतर ठिकाणे पाहण्याच्या आणि अज्ञात क्षेत्रांचा शोध घेण्याच्या मानवी गरजांमध्ये पर्यटनाच्या घटनेचे मूळ आहे.[३]


जगातील सर्वात प्राचीन संस्कृतीपैकी एक असलेले भारत हे जगातील सर्वात लोकप्रिय पर्यटन स्थळांपैकी एक म्हणून उदयास येत आहे.[४] महाराष्ट्र हे पर्यटनाच्या दृष्टीने विविध पर्वत रांगा, नयनरम्य समुद्रकिनारे, गडकिल्ले, धबधबे, प्राचीन लेणी, धार्मिक तीर्थक्षेत्रे, अभयारण्ये अशी एक ना अनेक आकर्शण स्थळे असे पर्यटन समृध्द राज्य आहे.[५] औरंगाबाद जिल्ह्यास देखील स्वतःची ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभली असून, जिल्ह्यातील वेरूळ हे ठिकाण युनेस्को(UNESCO) या जागतिक संघटनेने जागतिक वारसा म्हणून मान्यता देऊन यास जागतिक पर्यटन स्थळांचा दर्जा दिला आहे.[६]

पर्यटन हा जगातील सर्वात मोठा उद्योग म्हणून ओळखला जातो.[७] भारतातील पर्यटन उद्योग क्रुझ, साहस, वैद्यकीय, आरोग्य, क्रिया, इको टुरिझम, चित्रपट ग्रामीण आणि धार्मिक पर्यटन ते भौगोलिक विविधता जागतिक वारसा स्थळे आणि विशिष्ट पर्यटन यासारख्या सेवा पुरवून आर्थिक विकासात महत्त्वाची भूमिका बजावत आहे. आज पर्यटन हे सर्वात वेगाने वाढणाऱ्या आर्थिक क्षेत्रांपैकी एक आहे आणि व्यापार, रोजगार निर्मिती, गुंतवणूक, पायाभूत सुविधांचा विकास आणि सामाजिक समावेश यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावते.[८]

- **अभ्यास क्षेत्र**

वेरूळ लेणी महाराष्ट्र राज्याच्या औरंगाबाद (छ. संभाजीनगर) शहराच्या उत्तर-वायव्येस ३० कि.मी. अंतरावर औरंगाबाद-चाळीसगाव मार्गावार स्थित असून लेणीचे २०°१' ३५" उत्तर अक्षांश आणि ७५°१०' ४५" पूर्व रेक्षांश दरम्यान भौगोलिक स्थान आहे.[९] भव्य एलोरा लेणी आता युनोस्कोच्या जागतिक वारसा यादीचा भाग आहे. लेणीची स्थानिक भाषेत 'वेरूळ लणी' म्हणून ओळख आहे. लेणी एका मोठ्या पठाराच्या खडकात कोरली असून, ती २ कि.मी. पर्यंत, एका अर्धवर्तुळाच्या स्वरूपात आहे. बौध्द समूह, उजवीकडे देक्षिणेला, उत्तरेला डाव्या बाजूला जैन लेणी तर मध्यभागी हिंदू लेणी समूह आहे.

Location Map of Aurangabad District



- **प्राकृतिक रचना**

भुगोलाच्या दृष्टीने, एलोरा आणि त्यांच्या सभोवतालचा परिसर पश्चिम घाट नावाच्या पर्वतराजीच्या तुलनेने सपाट प्रदेशात येतो. भूगर्भशास्त्रज्ञांनी या बेसाल्ट स्क्रॅपला 'डेक्कन ट्रॅप' असे संबोधले, डेक्कन हा सामान्यतः दक्षिण भारताचा संदर्भ देणारा शब्द आहे आणि ट्रॅप खडकाच्या निर्मितीसारखा पायरीचा संदर्भ घेतो. निसर्गाने प्राचीन ज्वालामुखीय क्रियाकलापांच्या मार्गाने हा प्रदेश रॉक-कट ऑर्किटेक्चरसाठी तयार केला होता.[१०]

**शोध निबंधाची उद्दिष्टचे**

१. वेरूळ लेणीचे स्थान व प्राकृतिक रचना दर्शविणे.

२. वेरूळ लेणीचा सविस्तर अभ्यास करणे.

३. वेरूळ लेणी पर्यटन स्थळाला भेटी दिलेल्या पर्यटकांचा आढावा घेणे.

- **संशोधन पध्दत**

प्रस्तुत संशोधन लेख द्वितीय स्त्रोतावर आधारित आहे. ज्यामध्ये विषयाशी संबंधित पुस्तके, प्रकाशित शोध-निबंध, मासिके, शासकीय अहवाल, जिल्हा सामाजिक-आर्थिक समालोचन आदी आणि भौगोलिक तंत्रामध्ये नकाशे, आलेख, जी.पी.एस. तंत्रप्रणाली, संगणक सॉफ्टवेअर तसेच पर्यटन स्थळातील संकलित आकडेवारीचे विश्लेषण करण्यासाठी सांख्यिकीय पध्दतीचा उपयोग केला आहे.

- **विषय विमोचन**

**अ. वेरूळ लेण्याची पार्श्वभूमी**

औरंगाबाद शहरापासून २३ कि.मी. अंतरावर वायव्य दिशेला असणाऱ्या सह्याद्रीच्या रांगेतील महेशाद्री किंवा सातमाळ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पत्रत रांगेमधील चरणाद्री किंवा इंध्याद्री टेकड्यातील काळ्या पाषाणात जगप्रसिध्द अशा वेरूळ लेण्या खेदल्या आहेत.[११] "दीड ते २ कि.मी. च्या परिसरात विखुरलेल्या या लेणी समूहाची वर्गवारी बौध्द, हिंदू आणि जैन या तीन धर्मानुसार केलेली आहे. वेरूळ येथील शिल्पकलेचे व शैलग्रहांच्या खेदण्याचे काम ५ व्या शतकात सुरू झाले असले, तरी ६ व्या शतकाच्या मध्यापर्यंत महत्त्वपूर्ण लेण्या खोदण्याचे काम केले गेले. तिन्ही धर्माच्या लेण्यांच्या लेण्यांचा काळ हा जरी एकसारख्या नसला, तरी काही काळ ते काम तुर्काच्या वेळी चालू असावे, असे वाटते.

वेरूळ लेण्यांची कालगणना (अंदाजे)

१. बौध्द धर्मीय लेण्या इ.स.५५० ते ७५०

२. हिंदू धर्मीय लेण्या इ.स.६०० ते ८७५

३. जैन धर्मीय लेण्या इ.स. ८०० ते १००० सालात खोदल्या असाव्यात.[१२]

अशा त-हेने बौध्द, हिंदू व जैन धर्माच्या लेण्या ५ व्या ते १० व्या शतकात कोरल्या गेल्या.

वेरूळ लेणी समूह हे केवळ एक अद्वितीय कलात्मक आणि तात्रिक कार्य नाही तर ते बौध्द, हिंदू आणि जैन धर्माला समर्पित असलेल्या मठ आणि मंदिरांसह प्राचीन भारताचे वैशिष्ट्य असलेल्या साहिष्णुतेच्या भावनेचे उत्तम प्रकारे प्रतिबिंबित करते.[१३]


**ब. वेरूळ लेण्या**

**वेरूळ लेण्यांचे वर्गीकरण तक्ता क्र.१**

| अ.क्र. | वेरूळ लेण्या | लेण्यांची संख्या |
|---|---|---|
| 1 | बौद्ध धर्मिय लेण्या | 12 |
| 2 | हिंदू धर्मिय लेण्या | 17 |
| 3 | जैन धर्मिय लेण्या | 05 |
| ऐकूण लेण्या | | 34 |

**स्रोत:** Whc.unesco.org

वरिल तक्त्यानुसार, वेरूळच्या लेणी समूहात एकूण ३४ लेणी आहेत. लेणी क्र. १ ते १२ लेणी बौध्द कला अविष्कार घडवतात. या कला अविष्काराला बौध्द हे नाव एवढ्याचसाठी द्यायचं की या कला अभिव्यक्तीचा विषय बुध्द चरित्र, बोधिसत्वकथा आणि इतर बुध्द दैवत कथा, असा आहे. लेणी क्र. १३ ते २९ ही सतरा लेणी हिंदू कला अभिव्यक्ती म्हणून समजायची. कारण हिंदू दैवतकथा, पुराणकथा हा येथील कला आविष्काराचा विषय आहे. तर लेणी क्रमांक ३० ते ३४ अशी पाच लेणी वर्धमान महावीर, पार्श्वनाथ, बाहुबली आदींच्या अप्रतिम मूर्तीचा आविष्कार घडवितात. अनेक जैन देवकथा इथे शिल्पविश्वात अजरामर झाल्या, म्हणूनच यांना जैन लेणी असे संबोधनं प्राप्त झाले.[१४]




**१. बौध्द समूह (लेणी १-१२)**

या गटातील महत्त्वाची लेणी ५,१० आणि १२ आहेत. लेणी क्र.१० हा चैत्य हॉल आहे आणि विश्वकर्म किंवा सुतार-की-झोपडी (सुताराची झोपडी) म्हणून प्रसिध्द आहे यात गॅलरीसह प्रदान केलेला अत्यंत सजावटीचा दर्शनी भाग आहे. चैत्य सभामंडळात एका विशाल स्तूपासमोर बुध्दांची सुंदर प्रतिमा आहे. विहारापैकी ५ क्र. लेणी सर्वात मोठी आहे.

सर्वात जास्त तीन थाल (गुहा १२) नावाची तीन मजली गुहा प्रभावी विहार आहे. समोर मोठे एक खुले कोर्ट आहे जे विशाल मठात प्रवेश करते. सर्वात वरच्या मजल्यावर बुध्दांची प्रचंड शिल्पे आहेत.

- **हिंदू धर्मिय समूह (लेणी १३-२९)**

लेणी क्र. १४, १६ आणि २९ या हिंदू लेण्या आहेत. दशावतार म्हणून ओळखली जाणारी गुहा १५ ही दुमजली गुहा आहे, तिचा वरचा मजला बाजूंच्या भिंतीमध्ये खोल बुडलेल्या पटलांमध्ये मोठ्या आणि मजबूत शिल्पांनी सुशोभित केलेला आहे. गुहा १६ हे सुप्रतिध्द कैलास मंदिर आहे. उल्लेखनीय प्रमाण, स्थापनांची विस्तृत कामगिरी आणि शिल्पकलेच्या उत्तम कल्यामुळे हे भारतातील सर्व गुहा मंदिरापैकी सर्वात उल्लेखनीय आहे. रामेश्वरा (गुंफा २९) हे एक मोठे उत्खनन आहे ज्यात एक वेगळे किंग मंदिर आणि चौकोनी पाया, बासरी मुक्त शाफ्ट आणि कुशन कॅपिटल असलेले भव्य खांब आहेत. या गुहेच्या बाजूला असलेला सुंदर धबधबा च्या भव्य उत्खननाला मोठे आकर्षन देतो.

**३. जैन धर्मिय लेण्या (लेणी ३०-३४)**

इंद्र सभा जे दुमजली तीर्थ आहे ते महान केलास गुहेची नक्कल करण्याचा प्रयत्न आहे. जैन तीर्थकार, यक्ष आणि यक्षणीची शिल्पे वाखाण्याजोग्या कोशल्याने कोरलेली आहेत. या गुहांच्या छतावर आणि भिंतीवर चित्रांच्या खुणा आहेत आणि भारतातील कला चित्रांच्या इतिहासात त्यांनी खूप महत्त्व आहे. याला लागून गुहा ही जगन्नाथ सभा इंद्र सभेसारखीच पण आकाराने लहान आहे. जैन गुहुँतील खांब खूप मोठे आहेत, योग्य प्रमाणात आहेत आणि मडके आणि पर्णसंभाराने सुशोभित केलेले आहेत.

**क. वेरूळ लेणी पर्यटन स्थळ पर्यटकांचे आकर्षण**

वेरूळ येथील अभूतपूर्व लेण्यांमुळे श्रेष्ठ दर्जाचे/श्रेणीचे कलाकेंद्र म्हणूनही प्रसिध्द आहे आणि मुख्य म्हणजे वेरूळच्या लेण्यांत तर धार्मिकता आणि कलात्मकता यांचा अतिशय मनोहारी संगम झाला आहे. भारतीय शिल्पकलेचे एक अद्वितीय दर्शन/अप्रतिम दर्शन वेरूळला होते. म्हणून केवळ भारतातीलच नव्हे, तर जगातील कलारसिक व पर्यटक वेरूळची यात्रा करतात.[१५] अशा तर्हेने वेरूळ लेण्यातील सभागृह, चैत्य, प्रवेशद्वार, मंडप, बुध्दमूर्ती व तेथील कला, स्थापत्य उत्कृष्ट असल्याने ते पाहण्यासाठी देश-विरेशातून पर्यटक येतात. म्हणून हे पर्यटन स्थळ आंतरराष्ट्रीय दृष्ट्या महत्त्वाचे आहे.

**ड. वेरूळ लेणी पर्यटन स्थळाला भेटी दिलेले पर्यटक**

वेरूळ लेणी पर्यटन स्थळाला सन २०१३-१४ ते २०२२-२३ या काळात देशी-विदेशी पर्यटकांनी दिलेल्या भेटीची संख्या पुढील तक्त्यानुसार

**वेरूळ लेणी पर्यटन स्थळाला भेटी दिलेले पर्यटक तक्ता क्र.२**

| अ.क्र. | वर्ष | भारतीय पर्यटक | विदेशी पर्यटक |
|---|---|---|---|
| 1 | 2013-14 | 378790 | 16519 |
| 2 | 2014-15 | 311911 | 15771 |
| 3 | 2015-16 | 325307 | 143668 |
| 4 | 2016-17 | 506413 | 19042 |
| 5 | 2017-18 | 566721 | 15433 |
| 6 | 2018-19 | 567009 | 20321 |
| 7 | 2019-20 | 1255865 | 21407 |
| 8 | 2020-21 | 120283 | 82 |
| 9 | 2021-22 | 348349 | 605 |
| 10 | 2022-23 | 1415828 | 10744 |

**स्त्रोत:** १. महाराष्ट्र पुरातत्त्व विभाग अहवाल-२०१८
२. दैनिक लोकमत –२८ ऑगस्ट २०२३

**भारतीय पर्यटक**

वरिल तक्ता व ग्राफनुसार वेरूळ लेणी पर्यटन स्थळाला सन २०१३-१४ मध्ये ३७८७९०भारतीय पर्यटकांनी भेटी दिल्या. त्यानंतर वर्ष २०१४-१५ मध्ये ३११२११ पर्यटक तर वर्ष २०१५-१६ मध्ये ३२५३०७ पर्यटकांनी भेटी दिल्याची नोंद आहे. पुढे वर्ष २०१६-१७ मध्ये ३२५३०७ पर्यटकांनी भेटी दिल्याची नोंद आहे. पुढे वर्ष २०१६-१७ ते २०१८-१९ या काळात ५ लाख ते ५६७००९ पर्यटकांनी भेट दिली. वर्ष २०१९-२० मध्ये १२५५८६५ पर्यटकांनी वेरूळ लेणीला भेट दिली. वर्ष २०२०-२१ मध्ये १२०२८३ पर्यटक तर २०२१-२२ मध्ये कोरोनामुळे पर्यटकांच्या संख्येत वाढ होऊन, १४१५८२८ पर्यटक वेरूळ लेण्यांना भेटी दिल्याचे समोर आले.

**विदेश पर्यटक**

सन २०१३-१४ ते २०२२-२३ या काळात सर्वाधिक २१४०७ विदेशी पर्यटक वर्ष २०१९-२० मध्ये वेरूळ लेणी या पर्यटन स्थळाला भेअ दिली. त्यानंतर कोरोनामुळे २०२०-२१ मध्ये सर्वात कमी ८२ विदेशी पर्यटक वेरूळ लेणीला भेट दिली. सन २०२२-२३ मध्ये कोरोनानंतर पुन्हा १०७४४ विदेशी पर्यटक वेरूळ लेणीला भेट दिल्याची नोंद आहे.

- **निष्कर्ष:**

१. वेरूळ लेणी चरणद्री किंवा इध्याद्री टेकड्यात खोदल्यामुळे, प्राकृतिक दृष्ट्या लेणीस महत्त्व असल्याचे आढळून आले.

२. वेरूळ लेण्या ५ व्या ते १० व्या शतकात खोदण्यात आल्या.

३. वेरूळ लेण्या बौध्द, हिंदू व जैन धर्मियांच्या असल्याने, त्या प्राचीन भारताचे वैशिष्ट्ये ww असलेल्या सहिष्णुतेच्या भावनेचे प्रतिबिंबित करतात.

४. वेरूळ लेणीतील क्र. १ ते १२ लेणी बौध्द कला अविष्कार घडवताना आढळतात. त्यात बुध्द चरित्, बोधिसत्कथा आणि इतर बुध्द दैवतकथा आदी.

५. लेणी क्र. १३ ते २९ या १७ लेण्या हिंदू कला अभिव्यक्ती असून, त्यात हिंदू दैवतकथा, पुरानकथा यांचा अविष्कार आढळून येतो.

६. लेणी क्र. ३० ते ३४ या ५ लेण्या वर्धमान महावीर, पार्श्वनाथ, बाहुबली आदींच्या अप्रतिम मूर्तीचा अविष्कार घडवताना आढळून येतात.

७. वेरूळ लेण्यातील सभागृह, चैत्य, प्रवेशद्वार, मंडप, केलास मंदिर, बुध्दमूर्ती व तेथील कला, स्थापत्य हे पर्यटकांचे आकर्षण ठरत आहे.

८. सन २०१३-१४ ते २०२२-२३ या काळात सर्वाधिक १४१५८२८ भारतीय पर्यटकांनी २०२२-२३ या वर्षात वेरूळ लेखीला भेटी दिल्या तर सन २०१४-१५ मध्ये इतर वर्षाच्या तुलनेत कमी ३११२११ पर्यटक वेरूळ लेणीस भेट दिल्याचे आढळून आले.

९. सन २०१३-१४ ते २०२२-२३ या काळात सर्वाधिक २१४०७ पर्यटकांनी वेरूळ लेणीस भेट दिली तर कोरोनामुळे वर्ष २०२०-२१ मध्ये सर्वात कमी ८२ पर्यटकांनी वेरूळ लेणीस भेट दिल्याची नोंद आढळते.

१०. निवास, भोजन, वाहतूक व्यवस्था आदी सुविधेमुळे वर्ष-निहाय देशी-विदेशी पर्यटकांच्या संख्येत वाढ होतांना आढळून आली. I

११. वेरूळ लेणीला देशी-विदेशी पर्यटकांनी दिलेल्या भेटीतून रोजगार संधी व परकीय चलन प्राप्त होत आहे.

**संदर्भ सूचीः**


१. Ashture S.B. (2018): Satisfaction Index, A Study in Tourism Geography, Aayushi International Interdisciplinary Research Journal, Vol-V, Issue-x, P-18

२. शिंदे सुनिता शंकरराव आणि शिंदे दत्ता राधाकिसन (२०१८), परभणी जिल्ह्यातील पर्यटन स्थळांचा भौगोलिक अभ्यास, Aayushi International Interdisciplinary Research Journal, Vol-V, Issue-IX, P-146

३. Gurham Akdag & Zafer Oter (2011), Assessment of World Torism From a Geographical Perspective and a Comparative View of Leading Destinations in the market, Procedia Social and Behavioral Sciences, P- 217

४. भारत सरकार (२०२३), अवसंरचना और स्वच्छता के खेत्रों में पर्यटन स्थलों का मूल्यांकन, (पर्यटन मंत्रालय द्वारा) पृ.९

५. महाराष्ट्र शासन (२०२१), 'लोकराज्य' माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई, पृ.१२

६. महाराष्ट्र शासन (२०२२), जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, जिल्हा औरंगाबाद, जिल्हा सांख्यिकी कार्यालय, औरंगाबाद, पृ.११

७. Rajni Taneja (2006), Travel Geography, Alfa Publication, New Delhi, P- 195

८. भारत सरकार (२०२३), अवसंरचना और स्वच्छता के क्षेत्रों में पर्यटन स्थलों का मूल्यांकन, उपरोक्त, पृ.९

९. Whc.unesco.org

१०. Certinlia.gov.in

११. टिपरे राधिका (२०१८), वेरूळ लेण्यातील शिल्पवैभव, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, पृ.६

१२. कित्ता, पृ.२१

१३. Whc.unesco.org

१४. देव प्रभाकर (२०२०), पाषण पालवी, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, पृ.१५.१६

१५. देगलूरकर गो.ब. (२०२३), वेरूळ दर्शन, स्नेहल प्रकाशन, पुणे, पृ.१२

१६. महाराष्ट्र शासन (२०१८), महाराष्ट्र पुरातत्व विभाग अहवाल

१७. दैनिक लोकमत २८ ऑगस्ट २०२३